# पैंजण पाऊल

सौ. शरदिनी महाडेश्वर

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४८४



REFBK-0023979
REFBK-0023979







ज्योति आर्ट प्रिंटर्स, मुंबई १३.

# पैंजण पाऊल

सौ. शरदिनी महाडेश्वर

REFBK-0023979
REFBK-0023979

डिंपल
पब्लिकेशन

प्रकाशक :

सौ. नम्रता मुळे
डिंपल पब्लिकेशन
३, कादंबरी सहवास
नौपाडा, वसई रोड
जि. ठाणे. ४०१२०२

प्रथमावृत्ती : १९८३

मुखपृष्ठ : साईनाथ रावराणे

© सौ. शरदिनी महाडेश्वर

मूल्य : १२ रुपये

मुद्रक :

यशवंत मुद्रणालय
२७४१, ए
महाद्वार रोड,
कोल्हापूर–४१६००२

स्वप्नफुलांच्या पाकळ्या
" लता मंगेशकर "
यांच्या पैंजणपावलांसाठी
माझी गाणी आभाळाला उंच भिडणाऱ्या
स्वर लतेसाठी—

**सौ. शरदिनी महाडेश्वर**

## डिंपल पब्लिकेशन महत्त्वाची प्रकाशनें

- वासूनाका सांगोपांग – भाऊ पाध्ये
- तोरण – मधु मंगेश कर्णिक
- पाचूचे बेट – माधव गडकरी
- नराधम – बियन चव्हाण
- शतऋतु – दिवाकर गंधे
- डोह अनोळखी – सौ. मालती मराठे
- चक्रावर्त – उमाकांत ठोमरे
- शहर नग्न होताना – श्रीरंग नारायण सुर्वे
- कारागार आणि इतर एकांकिका – सुरेश चिखले
- कोंडमारा – ल. ना. केरकर
- सौदे शरीराचे – प्रकाश भातम्ब्रेकर
- हातकड्या – राजा राजवाडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# गौरीतनया

गौरीतनया विघ्नहराया
श्री गणेशा वंदूया ॥ धृ ॥

सद्‌भावांच्या दूर्वा आणुनी
भावभक्तीची फुले वाहुनी
कार्यारंभी स्मरितो आम्ही
आशीर्वाद तुम्ही द्यावया ॥ १ ॥

रूप साजिरे तव आठवुनी
झांज किणकिणे नादावूनी
ढोलकीतुनी तान बोलुनी
रसिक जनांना सुखवूया ॥ २ ॥

मराठमोळ्या मुलखामधुनी
रंगदेवता प्रिय सर्वांहुनी
त्यात आवडे अती लावणी
शृंगाराने रंजवू या ॥ ३ ॥

# लावणी

थंडगार प्रेक्षागृही मंद उजेड दिव्याचा
गावरान लोकनाटच छंद माझ्या नवऱ्याचा

माझ्या माथ्यात उमले त्याने दिलेला गजरा
स्वारी भलती रंगेल छंद लावणीचा न्यारा

सुरू झाली लगबग पडदा मखमली सरके
ढोलकीच्या तोडचातून जणू बिजली थरके

थाप कडाडे जोसात खुळखुळ घुंगरांची
पदरात चेहऱ्याला लपवीत आली नाची

उभारशा बांध्यावर चोळी घट्ट खडीदार
मादकशा डोळचातून इष्कबाजी बेसुमार

शब्द भिजे श्रृंगारात अशी लावणी रंगली
साऱ्या दुनियेत तिला देऊ उपमा कुठली ?

रंग भडक साडीचा छान खुले दिव्यावर
आणि कोल्हापुरी साज धन्य झाला छातीवर

दाद खुषीची देताना नाही सुमार शिट्टयांना
अशी नाचली तालात मन भिरकावे नाण्यांना

नथीखाली लाल ओठ नखरा तंग नऊवारीचा
तिच्यावर लोभावतो माझा भ्रतार शेजेचा

नाही असूया मनात तिची अलबला घेते
क्षणापुरती सवत मलासुद्धा मोहवते....

# अत्तरात नहाल

अत्तरात नहाल असा रंगमहाल, हो तुम्ही
उधळीन गुलाल तुमच्यावरी

तुम्ही असे दुरात
कांटा सले उरात
ओवाळीन जीव माझा तुमच्यावरी

केली मोठी आरास
नका करू निराश
भाळले मी खरंच तुमच्यावरी

धडधडे काळीज
घोर जिवा उगीच
लोभावले पुरतीच तुमच्यावरी

घेते अशी चाहूल
वाजतसे पाऊल
कुर्बान जवानी राया तुमच्यावरी

हाय! वय असं ऐनात
कुणी हसे मनात
रात चांदण्याची फिदा तुमच्यावरी

चंदनाच्या धुपात
भरे गंध माथ्यात
गेला जडून जीव तुमच्यावरी

रेशमाच्या दिठीत
शहारल्या मिठीत
झोकुन दिले मी मला तुमच्यावरी

# वाट अडवू नको

वाट अडवू नको / नजर भिडवू नको

आम्ही गोकुळच्या गौळणी
सात रंगांचा साज करूनी
सात सुरांची तुझ्या मोहिनी
तुझ्या मुरलीत जीव असा जडवू नको
वाट अडवू नको नजर भिडवू नको

राजवर्खी बांगड्या सोनेरी
सोनचाफ्याच्या वेण्या जरतारी
शालू आमचे भारी भरजरी
पिचकारी रंगांची अशी उडवू नको
वाट अडवू नको नजर भिडवू नको

दह्यादुधाचे घट हे शिरी
मथुरेच्या निघालो बाजारी
करू नको अशी बळजोरी
खडा हातातला असा तू दडवू नको
वाट अडवू नको नजर भिडवू नको

## सवाल : जबाब

पुरुषाचा सवाल : ऐक नारी तू सवाल माझा
उत्तर याचे देशील का ?
पुराणातली कथा नव्हे ही
कलियुगातील सत्यकथा
नववधू होती रसिक मनाची
दर रातीला रंग नवा
धनी तिचा तो मर्द फाकडा
कमळ मिठीला भृंग हवा
पुनव रूपेरी रात चांदणी
तिला नकोशी का झाली
उरात रुतल्या काचोळीला
चटके देऊन का गेली ?

ऐका ऽऽ

जबाब : दूर सखा ही नार एकटी
रात चांदणी तिला छळी
जाळून गेली कोमल काया
बिरहिणीला चांदण चोळी

पुरुषाचा सवाल : कुळवंताची नार असुनिया
खिडकीमध्ये का बसली
माथ्यावरचा पदर ढळवुनि
फितुर कुणाला ती झाली ?

ऐका ऽऽ

जबाब : कुळवंताची नार विरहिणी
खिडकी मधुनी चंद्र बघे
जाणून आहे मनरमणाला
तिच्या मुखाचा ध्यास जडे

माथ्यावरचा पदर ढळवुनी
तंद्रीतच ती चंद्राला
विनवीत होती नको छळू तू
दूर देशीच्या रमणाला

पुरुषाचा सवाल : दूर तिच्या साजणाचा जर का
उभ्या रातीला ध्यास तिला
घरंदाज त्या गरतीचा ग
टिळा कुणी तो विस्कटला ?

ऐका ऽऽ

जबाब : चंद्रावरती टेकून माथा
राजस मुखडा आठवला
स्वप्नामध्ये उशी कवळता
साजण तिज भेटून गेला

त्या भेटीची खूण उमटली
कमिजावरती सजणाच्या
उशी रेशमी मिरवीत राही
टिळा तिच्या तो माथ्याचा

पुरुषाचा सवाल : विरहिणीला त्या कशास आता
गजरा ल्यावासा वाटे
भाळून जावा जीव कुणावर
का असले काहुर दाटे ?

ऐका ऽऽ

जबाब : गजऱ्यावरती लोभ सख्याचा
मुजरा त्याच्या नजरेचा
तिला वाटते असे नटुनिया
मुलुख तुडविता स्वप्नांचा

अनोळखीच्या गावामध्ये
ओळख देईल तो गजरा
मनरमणाच्या धुंद मिठीने
जीव पुन्हा व्हावा बुजरा

मुलुखगिरीवर मर्द मराठा
या देशाची रीत जुनी
विरहामध्ये प्रीतसागरा
भरती येत इथे अजुनी

# महाराष्ट्र कन्या

महाराष्ट्र कन्या कशी माझी मराठी सजलीं
शेतातून कष्टती जे त्यांच्या घामाने भिजली

जनाबाई बहिणाई मान थोरलेपणाचा
हातातल्या लेखणीने वेदनेला फुटे वाचा

जिजाईच्या सावलीत शूर शिवाजी घडला
त्याच्या मर्दानीपणात इथे पोवाडा रंगला

देशासाठी लढणाऱ्या वीरांसाठी प्रकटली
लढवय्येपणावर इथे लावणी भुलली

शाहिराला कंठ फुटे असा आश्विन उगवे
गेंदेबाज झेंडूफुले जसे रंगीत शेमले

माती राकट इथली हिचा दणकट हेका
इतिहास पुन्हा पुन्हा इथे होतसे बोलका

समृद्धीच्या लक्ष्मीला कसे सोसावे कुलूप
अन्यायाचा पाढा इथे बोलका हो आपोआप

अजूनही जेंव्हा जेव्हा कुठे जुलूम घडती
द्रौपदीचा बंधू होतो पीडलेल्यांचा सारथी

अशा माझ्या मराठीचा आहे मला अभिमान
नित्य नवी तऱ्हा हिची सदा आहे ही तरूण

# चुडा भरताना

अनोळखी शहरात शिरताना पाहुणी मी
शिवशाहीचा कानोसा इथे वास्तूवास्तूतुनी

साताऱ्याच्या या मातीला शूर व्यक्तित्वाचा वास
पूर्वजांच्या धाडसांचा बोलकाच इतिहास

कृष्णाकाठच्या भूमीला समृद्धीचे वरदान
शेतकऱ्याच्या मुखात तुकोबाचे महिमान

इथे शेतमळ्यातून पीक उंच उंच डुले
उसाच्या ग फडामध्ये होती आभास कसले

शाहीराच्या लावणीला दिसे इथं फेटेवाला
सज्जनगडावरती भक्तिभाव रंगलेला

दूर उंच पहाडात पराक्रमाचे निनाद
म्हणे शिलंगणासाठी मोठा असायचा थाट

छान बाशिंगे पाहून घुमे सनई निनाद
चुडा भरताना घेते सौभाग्याला आशीर्वाद

पैंजण पाऊल

## उसाच्या फडात

डोळयांची संगीन
सांज ही रंगीन
उसाच्या फडात वाट रोखली
मर्दानी माझ्या रायाने जवानी जोखली

कोवळं कणीस
सोळावं वरीस
एकटी मला गाठून चिठ्ठी फेकली
मर्दानी माझ्या रायाने जवानी जोखली

रेशमी उशीची
हुरहुर खुशीची
पिरतीची त्याच्या न्यारीच गोडी चाखली
मर्दानी माझ्या रायाने जवानी जोखली

धीट भलता
शीळ घालता
भरदार फळांची फांदी वाकली
मर्दानी माझ्या रायाने जवानी जोखली

# विडा

शयनमहाली रात रेशमी मैफल शृंगाराची
कशिदा हसला चोळीवरचा अवघडले मी जराशी

लाज चांदण्यांत भिजताना विडा रंगला
धीट ओठानी अचानक डाव साधला

उभार बांधा पदर लपेटुन थरथरणारी काया
पाठ फिरवुनी धीर दिला मी धडधडणाऱ्या हृदया

नाजूक नकार नकोचा माझ्या ओठी अडला
धीट ओठांनी अचानक डाव साधला

झुंबरातला मंद उजेड बंद करून या म्हटलं.
मस्तीभरल्या बेफिकिरीनं नाही त्यानं जुमानलं
धुंद वारं पिऊन अंगाशी भिडला
धीट ओठांनी अचानक डाव साधला

## साजणा

जरी बुंदक्याची साडी रेशमी आणाना
नव्या नवेलीची माझी हौस पुरवताना साजणा

पदावरती छान कोयरी
खुलून दिसतो रंग अंजिरी
रात चांदणी होई बावरी
मोगऱ्याच्या अत्तराचा फाया तुम्ही द्याना साजणा

छुमक् छनन् पैंजण पायी
मेंदी नक्षी ठायी ठायी
खुलू दे इष्काची राई
नजर अशी माझ्यावरती भिडवू नका ना साजणा

कळी पानाआड लाजे
चंद्रकोर भाळी साजे
तुम्हीच या दिलाचे राजे
लाज मला वाटे आता सामोरी येताना साजणा

# अरबाच्या देशात

अजून हळद ओली / माझ्या लग्नातली
पर मुलखात पती चाकरीला
हर रातीला छळतो दुरावा
माझा साजण मला कुणी भेटवा
मला अरबाच्या देशात पाठवा

सेंट पाठवलं त्यानं वेड केलं
प्यास डोळ्यांची माझ्या ही मिटवा
सात दर्यापार माझं तकदीर
गोषाआडून ओळख पटवा

साडी टिकल्यांची भारी किनखाबाची
मेंदी लावून मला थोडी नटवा
बसून विमानात निघेन ऐटीत
हाती इष्काच्या दव्याचा बटवा

दगा देईल कुणी खतरा वाटे मनी
कटचार उराशी हळूच लपवा
उंटावरून मला आवडे बसायला
असे डोहाळे हौसेनं पुरवा

बाळू येईल खुशीत राया घेईल मिठीत
असं नजरेत सपान जागवा

# बदली

घास पुरणपोळीचा अडला ओठात
घराचा मालक परमुलखात
लावणीची रायाला चटक लागली
नवऱ्याची माझ्या बदली, साताऱ्याला झाली ॥ १ ॥

जत्रेची रात्र असेल चांदणं मनात
राया रंगला असेल तमाशापटात
कोऱ्या नोटांची त्याला पर्वा कुठली
नवऱ्याची माझ्या बदली, साताऱ्याला झाली ॥ २ ॥

तंग रेशमी साडीचा भडकसा रंग
रायाच्या डोळ्यात दाटेल अनंग
मजा होळीची त्याने असेल लुटली
नवऱ्याची माझ्या बदली, साताऱ्याला झाली ॥ ३ ॥

लालडीत ओठांच्या देईल तो विडा
माहीत आहे मला तो होतो किती वेडा
रजा शिमग्याची सार्थकी असेल लागली
नवऱ्याची माझ्या बदली, साताऱ्याला झाली ॥ ४ ॥

मध्यान् रातीला कशी जाग मला आली
अवचित दाराची कडी वाजली
झोप डोळयातली माझ्या उडाली
स्वारी सातारहून अचानक आली
स्वारी सातारहून अचानक आली ॥ ५ ॥

## हौशी तुम्ही राया

हौशी तुम्ही राया अहो सुखातही घडी नाहो
राणीसारखी आता हो मला वागवा

केस कुरळे हे न्हालेले
सैल सैल मी बांधले
चमेलीचा गजरा माझ्यासाठी मागवा

रेशमाची नऊवारी
पायघोळ जरतारी
ऐनेदार चोळी तुम्हीं मला आणवा

गोऱ्या गोऱ्या मनगटात
बिल्वर हे साजतात
कोल्हापुरी साज, तुम्ही मला, लेववा

लाल लाल ओठात
विडा लावा थाटात
लावणीच्या मुलुखात रात जागवा

# आजोळ

बकुळीच्या वासासंगे । मन आजोळास गेले
घमघमता मोगरा लाल वाटेने धावले ।। ध्रु ।।

पोर एवढीशी मी ग डोंगरात हिंडलेली
मोगरे नि करवंदे खुडताना दंगलेली
आजोळच्या गावाकडे बालपण थांबलेले ।। १ ।।

नदी वाहताना तिचे कसे विचारावे कूळ
सखे तुझ्या गप्पांमध्ये कोकणातले गोकूळ
तिळा उघडता कुणी त्यात हरखून गेले ।। २ ।।

दहिकाल्यातील राजा बोजा वाहतो उद्याला
तुझ्या जलद गतीत झांज तबला साथीला
हास्य विनोदात तू ग क्षण क्षण गुंफलेले ।। ३ ।।

# मी मैफलीतली नाही

मी मैफलीतली नाही नुपुरांचा नाही ध्यास
पण कधीच नच मिटणारी ओठावर आहे प्यास

कानातुन डूल फुलांचे बिलगली माळ अंगास
श्वासातुन बोलून गेला मनचाच लाडका वास

मज नको बाग कृत्रिम भुलणार न कारजांस
झुळझुळत्या रानझऱ्याची अनिवार ओढ हृदयास

घनदाट सावली पसरी वाटेवर वृक्ष सुजाण
ती मला आवडे जागा आहे मी मुग्ध अजाण

डोळाभर चंद्र पहावा अंगावर पाऊस घ्यावा
हा हट्ट लाडका माझा करतो पण पाठपुरावा

हा असा जोगवा माझा ही जगावेगळी भीक
मज नकोत आणाभाका राहू दे अशी बिनधोक

# दारात साजण

झुकली नजर लाजुन थरथर सामोरा सुखाचा पेला
दारात साजण उरात बेचैन दुरात चांदणवेळा

पाण्यात ढाळून काजळ रात ही शांत गाव भवतीचा
वाऱ्याची लहर मनात बहर वाजे चुडा नवतीचा
दरवळले कुठे गुलाब अत्तर झळाळली चंद्रकळा
दारात साजण उरात बेचैन दुरात चांदण वेळा

भिडवून डोळे विचारले काही मंद उजेड दिव्याचा
कसे झुलवावे कसे निसटावे बंद विळखा बाहूचा
विजेपरी गेला चमकून क्षण अंगांगात सोनसळा
दारात साजण उरात बेचैन दुरात चांदणवेळा

# तुझ्यावर प्रेम करताना

तुझ्यावर प्रेम करताना
दिवे हे वाटती दोस्त
जळावे ज्योत होऊन
उरावी रात्र ही मस्त

जगावे कैफ होऊन
नको पर्वा कुणाचीही
तुझ्यावर प्रेम करताना
नुरावी मी न माझीही

तुझ्यावर पूर्ण मरतात
परंतु आणखी कोणी
तूही तिकडे फिदा होशी
कशासाठी जगावे मी ?

# पापण्या मिटतात तेव्हा

पापण्या मिटतात तेव्हा रोज तू स्वप्नात यावे
पावले पडतात तेथे हृदय माझे अंथरावे

तू नशा माझ्या सुरांची शब्द ही माझी कमाई
बाहुपाशी राजसा रे मी खुशीने कैद व्हावे

भेट होणे की न होणे हा कधी छळवाद होता
उमलत्या गजऱ्यासवे मी त्या क्षणासाठी झुरावे

रात्र ही वैरीण बनते दूर तू असतोस तेव्हा
फक्त गाण्यातून माझ्या मी तुला सर्वस्व द्यावे

# मुजरा

मज कैफ असा की जीव होतसे बुजरा
मी झुकवुन डोळे करते तुजला मुजरा

भरलेली मैफल पैंजण पाऊल बोले
हे ओठ विड्याने रंगून गेले ओले
आलास अचानक जसा उमलतो गजरा
मी झुकवुन डोळे करते तुजला मुजरा

बेहोष अशी जाहले तुझ्या येण्याने
पडदा लाजेचा उभा जवळ घेण्याने
जरी तुझ्याचसाठी केला सगळा नखरा
मी झुकवुन डोळे करते तुजला मुजरा

उजळल्या दिव्यांनी महाल भारून गेला
तव स्पर्श विजेचा जखमा कोरून गेला
जालीम तुझ्या मी चुकवत असता नजरा
मी झुकवुन डोळे करते तुजला मुजरा

# लुट्टू नकोस मला

लुटू नकोस मला / ठेव जरा बाकी तू
बेभान करू नकोस / मदहोष साकी तू

ही नशा कमान / सुरांची झुलती
फुले खुशीची / गात्रांवर फुलती

खंजीर असा / हृदयावर चलताना
हवे नकोच्या / काठावर कलताना

आणभाक घेताना / अनामिक हुरहुरते
आसू डोळ्यातून / रातरात मी झुरते

प्यास ओठांवर / चांदण्यात कैफ मला
जीव इष्काच्या पायी / गुंतुन गेला

# दिवाणी दिवाणी

मिटू देत प्यास / तुझ्या नजरभेटीची
होऊ देत चर्चा / नको फिकीर कशाची

बाधा प्रीतीची कशी / छपवावी तरी
हरेक लाट कशी / थोपवावी तरी

प्रकटावा प्याल्यातून / असा प्रियकर की
आसवात प्रीतीचा / व्हावा सागर की

दिवाणी दिवाणी / मी लाडक्याची
कसोटीच घेतसे नियती / अशी नशीबाची

# जखम

श्वास हुंगून घे / हौस फिटवून घे
खुश नशीब जमाना | सार्थकी लावून घे

आज झोळी / भरू देत माझी
लाख नक्षत्रे / अशी आज राजी

लखलाभ बेचैनी / मस्त कलंदर ही हवा
जखम भळभळती / नकोच त्यावरती दवा

हाल माझे ना / कळू देत कोणा
इलाज नसलेले / दुखणे हे जाणा

## चांदण राती

जरी पदराची / पायघडी मी / केली तुजसाठी
या घटकेला / झाले आहे / वेडी तुजसाठी

मुश्कील जगणे / प्रिती असली / मिरवत असताना
बाग फुलांची / जाळू नको / माघार वळताना

तू नजरेने / सतवत असता / लाज मला वाटे
भेट तुझी ही / टाळू कशी मी / किती काहूर दाटे

या केसांची / रेशिम शय्या / सारूनिया राती
वेल जुईची / बहरून आली / या चांदणराती

# शहरात

रस्त्यावरील टिंबे रेषेत पेटलेली
गतिमान रात्र आहे शहरात भेटलेली

काळी हिची किनार भिजवून सागरात
शिसवी उनाड वाटा मस्तीत आपुल्याच
प्रतिबिंब वाहनांचे डोळ्यात दाटलेली
गतिमान रात्र आहे शहरात भेटलेली

माणिक लाल पेटे धोका हवाहवासा
हुरहूर काळजात आवेग वाहनाचा
उडत्या बटाबटांनी गजऱ्यात साठलेली
गतिमान रात्र आहे शहरात भेटलेली

संपू नयेच प्रवास संपू नयेच ध्यास
बिनधास्त सोबतीचा कोणा न मागमूस
घटकाभरात साथ लखलाभ वाटलेली
गतिमान रात्र आहे शहरात भेटलेली

# सोनसळी पदरामध्ये

सोनसळी पदरामध्ये ओल्या केसांनी
थंडगार पाण्यात भिजली जवानी

रिमझिमत्या सरींमधून चालते तोऱ्यात
नको येऊस असा तू आडव्या धारात
बिलगलेल्या साडीवर का नजर रोखुनी
थंडगार पाण्यात भिजली जवानी

पावसात भिजण्याची मजा लुटू दे
शितळशा धारेखाली हौस फिटू दे
अंग अंग शिरशिरतेय नशा दिवाणी
थंडगार पाण्यात भिजली जवानी

डोळयांची भाषा की म्हणू लबाडी
स्वागतास सामोरा तू खुल्या कवाडी
धुंदफुंद जवळिकीची तऱ्हा मर्दानी
थंडगार पाण्यात भिजली जवानी

# दर्याकाठी

खोल खोल पाण्यान् तू नको नेऊ होरी
वाट बघतेय् गोमू मी पीरत येरी

दर्याकाठी झावळ्यांच्या खोपी मंदी
तू राजा मी राणी कधी रेतीमंदी
नवी नवरी मी लाजून गोरी मोरी
चांदण्यात दुनिया बुडेल येरे घरी
वाट बघतेय् गोमू मी पीरत येरी ॥ १ ॥

मला नको बंगला नको मोटारगाडी
दागिन्यांची पिरतीपरीस काय गोडी
हौस माझी निरालीच हाय जरी
शंखशिपा आवरती मला भारी
वाट बघतेय गोमू मी पीरत येरी ॥ २ ॥

चल हातात हात असे गुंतवू या
जवानीच्या घटका या जागवू या
अवखळ लाटेन भिजे साडी चंदेरी
चमचम पाण्यान् आपली जमेल जोरी ॥ ३ ॥

# आला आश्विन

आला आश्विन चांदण्यात न्हाला
पायी छुमछुम पैंजण ल्याला

टिपरी घुमे जोसात रास गरबा नृत्यात
अंबा माऊलीचं जयगीत गातात
रात रात हा जागवीत आला
पायी छुमछुम पैंजण ल्याला ॥ १ ॥

उगवली पहाट झेंडू फुले दारात
नवरात्रीसाठी / दीपपूजेचा थाट
सोनउन्हात निसर्ग खुलला
पायी छुमछुम पैंजण ल्याला ॥ २ ॥

डफ वाजे तालात / शाहीर येई रंगीत
शिलंगणाचा थाट / पंचारती हातात
सुवासिनींच्या हर्षात भिजला
पायी छुमछुम पैंजण ल्याला

## वाजतोय् बेंडबाजा

वाजतोय् बेंडबाजा कोलीवाड्यात ग
नाचतात करवल्या मांडवात ग

आज नवरीचं ग पातल हळदीनं भरलं
तिच्या डोईत ग डोईत ग फुलांचं तारं चमचमलं
हिरवा चुडा बघा नवरीच्या हातात ग
नाचतान करवल्या मांडवात ग

या गो दांड्यावरनं दांड्यावरनं नवरदेव वाजत आला
त्याच्या डोईवरी डोईवरी लाल गोंडे झुलती छत्रीला
उजळली रोषणाई साऱ्या गावात ग
नाचतान करवल्या मांडवात ग

न्हवरा गोमूचा गोमूचा मोठ्या रूबाबात आला
त्यानं घातलाय ग घातलाय ग सुटबूट टाय मिरवायला
मोठ्या थाटानं जाईल ही वरात ग
नाचतान करवल्या मांडवात ग

# पुनव

चांदण्यानं कोळीवाडा उजळला उजळला
पुनवेची रात जागवाया चला ।। ध्रृ ।।

हात घालून हातात संगतीनं
गोमू नाचूया रातभर रंगतीनं
ढोलकीवाला बघा कसा जोसात आला
पुनवेची रात हो जागवाया चला ।। १ ।।

चांदी खेळते खुलून रेतीत
लाटा फुटती धुंदून मस्तीत
आलं उधाण चंदेरी दर्याला
पुनवेची रात हो जागवाया चला ।। २ ।।

माडबनात सळसळ वाऱ्याची
आभाळात सजावट ताऱ्यांची
फेस येतोय कसा खाऱ्या पाण्याला
पुनवेची रात हो जागवाया चला ।। ३ ।।

# केस मोकळे धुपात

केस मोकळे धुपात धूर आज चंदनी
श्वास श्वास टिपून घेत धुंदल्या मिठीतुनी

मी किती सुखात गात्र गात्र आज उमलले
स्वप्न रेशमी दिठीत या इथे विसावले
भर दिसात लोचनात रात्र येत दाटुनी

दूर डोंगरात एक शुभ्र पाखरू उडे
नजर भेटताच आज उमललेत केवडे
स्वर्ग ये कवेत असा हासल्या खुशीतुनी

मी भिजून चिबचिब थेंबथेंब निथळतो
रोमरोम फुलताना हर्ष नाचनाचतो
राजसा तुझ्यासमीप चूर लाजलाजुनी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# अमृत घटिका

जळात काही आता उरले भास तरल चांदण ओले
पापणीत तव भेटीमधले सुखमय संमोहन उमले

धुंद सुरांच्या बरसातीचे ओंजळीत जपले दान
मोरपिसारे हर्षवणारे किरणांनी उमले रान
सूर थांबले तरीही त्यांचे रोम रोम नर्तन चाले

तलम धुक्याची शुभ्र ओढणी बिलगुन बसता अंगाला
मन रमणाच्या धुंद मिठीने शब्द शब्द लाजुन गेला
मीलन गहिऱ्या मधुरात्रीचे गीत कुणीसे गुणगुणले

वीणेवरती कुणी छेडिली प्रियकर हृदयाची भाषा
पैंजण पाऊल तालावरती पेलु लागले सूर नशा
अमृत घटिका उमलुन येता संकोचुन डोळे झुकले

# भेट असा

भेट असा
गंध जसा
पहिल्याच
पावसाचा

उसळू दे
हर्ष असा
जीव व्हावा
वेडापिसा

धारेखाली
भिजताना
कैफ नवा
तुला मला

# गुन्हा

फेसाळल्या
चषकाला
ओठ असे
भिडताना

धुंद सूर
धुंद नशा
गुन्हा असा
घडताना

दूरातल्या
तुझ्यावर
जीव असा
जडताना

# उद्यासाठी

उद्यासाठी
गीत तुझे
उद्यासाठी
लक्ष फुले,

उद्यासाठी
क्षण फुंकरले
मी सगळे

उद्यासाठी
मीच मला
हरवून बसले

## सळसळ

चांदरात
ढळताना
जळात जळात

चांदरात
सळसळे
माडात माडात

चांदरात
ओलावता
रेतीत रेतीत

चांदरात
भिनताना
अंगात अंगात

# मोह तुझा

मोह तुझा
अनावर
आवराया
अपुरीच

तुझे ओठ
माझे गीत
तुझे सूर
माझी साद

जागरण
सारी रात
रुते उरी
चंद्रकोर

# धारा धारा

धारा धारा
आभाळात
धारा धारा
जमिनीत

धारा धारा
खिडकीत
धारा धारा
पहाडात

धारा धारा
नयनात
धारा धारा
थांबेनात

## हवं तेव्हा

हवं तेव्हा
नाही येत
पत्र तुझं

हवी तेव्हा
नाही होत
भेट तुझी

नको तेव्हा
तुला होते
मी हवीशी

नको तेव्हा
भेट तुझी
वेडीपाशी

# होडी एक सोडते मी

झावळ्यांचे घर माझे
कोळीवाड्यापाशी
शंखशिंपा वेचते मी
अलंकारासाठी

मासोळ्यांची तडफड
लाटा किनाऱ्याशी
वाळूचा मी बांधितसे
किल्ला कुणासाठी

पाखरांचे शुभ्र थवे
नभरेषेपाशी
फडफड चाले दूर
विसावण्यासाठी

वाऱ्याचीही भिरभिर
माडबनापाशी
होडी एक सोडते मी
राजा तुझ्यासाठी

# भर दिवसा

भर दिवसाचं ऊन वाटे मज शीतळ
स्वप्नील सख्या तू राधेचा घननीळ

पानांची सळसळ श्वास होऊनी येते
पाण्याची थरथर घटास स्पर्शून जाते
लाजेत बुडाला हनुवटीवरचा तीळ
स्वप्नील सख्या तू राधेचा घननीळ

होतात नशील्या लांब सावल्या तरूंच्या
मी बुंध्यापाशी हरखून जाते कितीदा
तव विरह पाडतो काळजास रे पीळ
स्वप्नील सख्या तू राधेचा घननीळ

रेतीत उमटल्या पायखुणा शोधते
मृगजळा साक्ष तव भासांवरती जगते
तू पैलतीराहुनी नको वाजवू शीळ
स्वप्नील सख्या तू राधेचा घननीळ

...ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
दा. क.

# कहाणीतली राजकुमारी

मंद मंद उजळता झुंबरे तेजाळावी रात
कहाणीतली राजकुमारी उतरावी डोळ्यात

दीपदान काचेचे त्यावरल्या रूतल्या नक्षीत
माझ्या मनिच्या गीताची लय उमटावी शब्दात
उरातल्या उत्कट इच्छांनी उमलावे दारात
कहाणीतली राणकुमारी उतरावी डोळ्यात

पायघड्यांस्तव जन्मच सारा उणे न आतिथ्यात
अत्तर शिंपून अंगांगावर गुलाबीच कैफात
तुझे भास जपता भितीच्या इंच इंच ऐन्यात
कहाणीतली राजकुमारी उतरावी डोळ्यात

वाजले न नुपूर पायींचे शब्द अडून ओठात
संपून गेली मीलन घटिका काही धुंद क्षणात
दुरावाच तव जवळ मनाच्या वैरिण होता रात
कहाणीतली राजकुमारी उतरावी डोळ्यात

## कलंदर

फकीर हा असा शिकंदर कैफ हो त्यास अनावर
झोपडी त्याला प्यारी उशाला घेतो पत्थर

वाट त्याची एकाकी भेटतो त्याला निर्झर
झऱ्याकाठी झाडांच्या शोधात फुलांत अत्तर

पाखरे स्वैर बघूनी टाकतो गलोल सत्वर
ऐकतो किलबिल त्यांची मिटवुनी उरात थरथर

होतसे तृप्त कधी तो भिजवुनी सुरात अंतर
कधी नभ निरखून बघता खुशीचे घुमे कबुतर

कधी रेशीम उन्हाचे स्पर्शण्या होतो आतुर
शरण रात्रीस एखाद्या झुकवुनी डोळे कातर

# झुंजुमुंजु पहाटेस

झुंजुमुंजु पहाटेस दव दिसलं
कुणी इवलंसं फूल उमलून हसलं

उगवतीच लालस कुंकू सांडलं
चांदणं नभाच्या चोळीचं पुसलं
कुणी इवलंसं फूल उमलून हसलं

कुणी हळूच काहीसं पुटपुटलं
धुंद वारं अत्तर शिंपीत सुटलं
कुणी इवलंसं फूल उमलून हसलं

रात गेली सरून म्हणून हुरहुरलं
चालताना लवून साकव कुरकुरलं
कुणी इवलंसं फूल उमलून हसलं

झाड हळदीनं न्हाऊन निघालं
नवी नव्हाळी निरखीत बसलं
कुणी इवलंसं फूल उमलून हसलं

# तुझ्या जरा चाहुलीने

चंद्रखूण रक्तऊन श्वासांचे गाणे
उरी जपून मी अजून भास हे दिवाणे ।। धृ ।।

जळी भिजल्या रेतीतून ठसे पावलांचे
तुझ्यासवे चलतांना मृगजळात भिजणे
तुझ्या आठवात मीच धुके धुके होणे
दूर डोंगराच्या रेषेत मिटून जाणे
एकटीच मी उभी इथे कुणीही नसणे
तुझ्या जरा चाहूलीने थरारुन जाणे

# सनई

कुठूनसा सनईचा
मंदमंद सूर येई
स्वप्नातल्या नगरीत
मला घेऊनिया जाई

जरिपदरावरती
चमकती मोर कसे
चोळीवर घुंगुरांचा
कशिदा उठून दिसे

मेंदीरेखली पावले
हिरवा चूडा बोले
शेलारीशी गाठ माझ्या
प्राणनाथ हळू हसले

उंबऱ्यावरचे माप
लवंडून आत गेले
नांव घेताना मी ग
लाजून लाल झाले

कुठूनसं येऊन त्यानी
पकडले नजरेने

डोळ्यांच्या ऐन्यात
कोणाची हारजीत

असा कधी सनईचा
मंद मंद सूर येई
स्वप्नातल्या नगरीत
मला घेऊनिया जाई

## शीळ

मेंदीभरले पाऊल चाले सावरीत जरीकाठ
घुमते शीळ तुझी कानात ।। ध्रृ ।।

भिरभिरता वाऱ्यावर पानें
हळूच तसले कुजबुज गाणें
आडवेळी या एकांतातच
का पडली ही गाठ ?
घुमते शीळ तुझी कानात ।। १ ।।

माथ्यावरती घट भरलेले
राजवर्खी बिल्वर किणकिणले
निघालेच मी श्रीरंगारे
नको अडवू तू वाट
घुमते शीळ तुझी कानात ।। २ ।।

## साक्षी

मी सावरू कसा ग फसव्या क्षणात तोल
सांगून येत नसते घटका अशी अमोल

पदरात वेचल्या मी अनमोल चांदण्या
उरीं दूरच्या नभाची आरास गोंदण्या

स्वर्गीय की सुरांचा उद्गार हा सखोल
सांगून येत नसते घटका अशी अमोल

वश जादू हो कुणाला की वाद्यमेळ सारा
कुठल्या अनाम हळव्या शब्दांस साज न्यारा

नाहीच थांबणार झुलता असा हिंदोल
सांगून येत नसते घटका अशी अमोल

हे पुण्य कोणते की वरदान लाभलेले
घेऊन ओढ कुठली जन्मास गीत आले

या सोहळ्यास साक्षी झाले कशी अबोल
सांगून येत नसते घटका अशी अमोल

# बाधा

पापण्यांचा स्पर्श या गालांवरी होणार आहे
जीव हरवावा अशी बाधा पुन्हा होणार आहे

या कळीला धुंद वाऱ्याची मिठी पडणार आहे
वादळी थैमान देहाशी पुन्हा भिडणार आहे

साजणाच्या पावलांचा नाद ग येणार आहे
सात रंगांच्या अनोख्या दालनी नेणार आहे

सात जन्मांचे सुरीले गीत हे जुळणार आहे
ओघ सरितेचा अखेरी सागरी मिळणार आहे

# आई

चंदनाचे चंद्रसूर्य रेखुनिया पाटावर
पूजिले मी बालपणी श्रावणाचे रविवार

देवापुढे सारवून रांगोळी मी रेखताना
आई आठवे मला ग तुझी सुरेल प्रार्थना

भावंडांना झोपवता तुझा पाळणा ऐकला
पुढे "वाग्वैजयंती"त मला अचूक भेटला

कळी मिटली तुझी ग कशी ऐन तारूण्यात
कुणी तुझ्या माहेराचे तुला शोधती माझ्यात

सजवित घरकुल समाधान कोनोकोनी
तुझ्या रसिकमनाची खूण अंतरी जपूनी

वाढुनिया पुढ्यातून मीच पाहते कौतुक
जेवणारा तृप्त होता माझ्या श्रमांचे सार्थक

भातुकली रंगलेली दंग होऊन पाहते
माझ्या सानुल्यांचा खेळ बघताना सुखावते

सूर सूर आनंदाचे मन हेलावते आहे
आई तुझे व्यक्तिमत्त्व माझ्या धमनीत वाहे !

# मुखडा उभा समोर

हसऱ्या फुलात साद हा देश मोहनेचा
असुनी सुखे सभोती बेचैन वेदनेचा

हा लाडका मुलूख खुणवी धुके इथेच
मी धुंडिल्यात वाटा मक्ता मुशाफिरीचा

उघड्या वहीत लाटा बिलगून पावलांस
मी होतसे दिवाणी हा शाप अप्सरेचा

मी शंख शिपल्यांनी शृंगारही करावा
आहे असा इरादा उद्दाम अंगनेचा

वैरीण ही सदाची कविता सजून आली
मुखडा उभा छळवाद स्वैरिणीचा

## रेशमी उन्हात आज

रेशमी उन्हात आज श्रावणसर भिजलेली
पाऊलवाटेवरती हाक तुझी रूजलेली

कुजबुजत्या वाऱ्याविण चाहूल नाही कुठली
टेकडी निळी पल्याड ढगांआड निजलेली

डोळयांना डोळयांचे आरसे नको झाले
नवतीच्या गालांवर लाज लाल सजलेली

पंख पेलती नभात सोनेरी किरणांना
आज तुझ्या धिटाईला मीच अशी बुजलेली

# दाद

सप्तसुरांच्या या भाषेला बंधन रेषा नाही
क्षितिजाचीही सीमारेषा ओलांडुनिया जाई

वीजपाखरू रागरागिण्या शब्दसुमांचे झेले
अभीष्ट चिंतक रात्र कंचनी झंकारित ती येई

थरथरणाऱ्या तारा तारा रसिक मनांची वाहवा
ही दिलदारी दुनियादारी हृदयी भरूनी घेई

भिडवूनिया डोळे डोळ्यांना कबूतरे टाळ्यांची
नशिबामध्ये ओंजळ भरले दान सुरांचे देई

खजिना असला सुर सरितेच्या काठावर मी साक्षी
क्षण सोन्याचा किमया भरला जिवात अलगद राही

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २३८७८
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0023979
REFBK-0023979


## कोर चंद्राची


हे तुला साकारणारे गीत मी विकणार नाही
बाग माझ्या भावनांची शापुनी सुकणार नाही

भेट झालेली तुझ्याशी त्या क्षणांचे स्वप्नपक्षी
ते असे गोंजरताना मी कधी थकणार नाही

झाड ओथंबून आले रास पायाशी फुलांची
सावल्या दूरात कलता वाट मी चुकणार नाही

मेघ मायावी कितीही कोर चंद्राची उराशी
तू दिलेल्या वेदनांना मी कधी मुकणार नाही.


सौ. मालती मराठे
डोह अनोळखी


बियन चव्हाण
नराधम

पैंजण पाऊल
पैंजण पाऊल
पैंजण पाऊल
पैंजण पाऊल
**पैंजण पाऊल**
पैंजण पाऊल
पैंजण पाऊल
पैंजण पाऊल
**पैंजण पाऊल**
पैंजण पाऊल
पैंजण पाऊल
पैंजण पाऊल
**पैंजण पाऊल**
पैंजण पाऊल
पैंजण पाऊल
पैंजण पाऊल